# म नो ग त

या शोधनिबंधाचा अभ्यासविषय "गडहिंग्लज तालुक्यातील पक्षीय राजकारण" (इ.स. १९८५-१९९५) हा निवडण्यामागे अनेक गोष्टी कारणीभूत ठरल्या. कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुका हा भौगोलिक आणि सामाजिक दृष्टया महत्वाचा आहे. कारण हा तालुका कर्नाटकाच्या सीमेवर असून, सीमेवरील काही भागातील लोक कानडी बोलतात. सामाजिक दृष्टया या तालुक्यामध्ये मराठा, लिंगायत आणि इतर मागासवर्गीय असे तीन जातीगट आहेत. तीनही गट संख्येच्या दृष्टीने तुल्यबळ आहेत. हा तालुका कोल्हापूर जिल्ह्यातील मागास तालुक्यातील एक असून याचा फारसा आर्थिक आणि सामाजिक विकास झालेला नाही. विकासाचे राजकारण साखर कारखान्याच्या द्वारा करण्याचा प्रयत्न महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी केला. सहकार चळवळ, सहकारी साखर कारखाने, पंचायत राज्यसंस्था आणि राज्यसरकार यांच्यामधील परस्पर सहाय्यातून महाराष्ट्रात कृषी औद्योगिक समाज स्थापन करण्याचे मा. यशवंतराव चव्हाणांचे स्वप्न होते. गडहिंग्लज तालुक्यात सहकारी संस्था, नगरपालिका, पंचायत समिती ही राजकारणाची तीन क्षेत्रे बनली. त्यांच्यामधील स्पर्धेतून आणि सहकार्यातून या तालुक्याचे स्थानिक राजकारण घडत गेले. विधान सभेच्या निवडणुकीत ही स्पर्धा स्पष्ट होते. या राजकारणाच्या तीनही क्षेत्रात गेल्या १० वर्षात मोठे बदल होत आहेत. जनता दलाचे नेते श्रीपतराव शिंदे यांनी १९९५ साली विधानसभा निवडणूक जिंकली आणि नंतर साखर कारखाना आणि नगरपालिकेच्या राजकारणावर वर्चस्व निर्माण केले. याच काळात कॉंग्रेस अंतर्गत गटबाजीचे राजकारण वाढीस लागले आणि त्याचा फायदा श्री. शिंदे यांना मिळाला. या सर्व गुंतागुंतीच्या राजकीय क्रियाप्रक्रियाबद्दल अभ्यास करण्याची उत्सुकता निर्माण

झाली. यातून या शोधनिबंधाच्या अभ्यास विषयाबाबतची निश्चितता झाली.

गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणावर प्रख्यात समाजसेवक डॉ. एस्. एस्. घाळी यांचा मोठा प्रभाव होता. त्यामुळे १९७८ च्या विधान सभा निवडणुकीत सर्व प्रस्थापित काँग्रेस पुढा-यांचा विरोध असतानाही गडहिंग्लज विधान सभेची जागा त्यांनी इंदिरा काँग्रेसचा उमेदवार म्हणून जिंकली. पश्चिम महाराष्ट्रात विजयी झालेले काँग्रेस (आय) चे ते एकमेव उमेदवार होते. त्यांच्या मृत्यूनंतर गडहिंग्लज तालुका राजकारणात अनेक नव्या नेत्यांचा उदय झाला. त्यामध्ये जनता पक्षाचे ॲड. श्रीपतराव शिंदे, गडहिंग्लज साखर कारखान्याचे संस्थापक आप्पासाहेब नलवडे, पूर्वाश्रमीच्या समाजवादी काँग्रेसचे पुढारी बाबासाहेब कुपेकर, डॉ. शरदचंद्र शहापूरकर, राजकुमार हत्तरकी इत्यादी नेत्यांचा उदय झाला. श्रीपतराव शिंदे वगळता बाकी सर्व पुढारी आज काँग्रेस पक्षांतर्गत वेगवेगळया गटाचे प्रतिनिधित्व करीत आहेत. १९८५ च्या विधान सभा निवडणुकीत तालुक्याच्या राजकारणाला कलाटणी मिळाली आणि श्रीपतराव शिंदे पुलोदमार्फत जनता पक्षाचे उमेदवार म्हणून निवडून आले. त्यानंतर त्यांनी आपली सत्ता बळकट केली आणि १९९० च्या विधान सभा निवडणुकीत आपली जागा कायम राखली. १९९० मध्ये ते गडहिंग्लज साखर कारखान्याचे अध्यक्ष झाले आणि त्यांचा प्रभाव वाढला. दरम्यानच्या काळात नगरपालिका आणि पंचायत समितीच्या राजकारणातही बदल झाले.

प्रस्तुत प्रबंधामध्ये गडहिंग्लज तालुक्यातील स्थानिक राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे. स्थानिक राजकारणात सहकारी साखर कारखाना, नगरपालिका आणि पंचायत समिती या राजकीय संस्थांची महत्वाची भूमिका असते. यासंस्थानी तालुक्याच्या राजकारणावर कसा

प्रकारे प्रभाव टाकला, राजकीय नेत्यांनी तालुक्याच्या विकासाचे प्रश्न किती प्रमाणात धसास लावले. गटबाजीमुळे विकास होतो की विकासाला खीळ बसते. राज्यस्तरीय राजकारणाचा तालुक्याच्या राजकारणावर कितपत परिणाम होतो, इत्यादी प्रश्नांचा अभ्यास गडहिंग्लज तालुक्यातील राजकारणाच्या संदर्भात करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी साखर कारखाना, नगरपालिका आणि पंचायत समित्याची इतिवृत्ते, अहवाल, स्थानिक वर्तमानपत्रे, निरनिराळी पत्रके इत्यादी साधनांचा उपयोग केला आहे. ऐतिहासिक दृष्टिकोनातून गडहिंग्लज तालुक्यातील गेल्या १० वर्षांच्या राजकारणाचे साधार, सुसंबंध आणि टीकात्मक विवेचन करण्यात आले आहे.

हा शोधनिबंध पूर्ण करण्याच्या कामी अनेकांचे सहकार्य लाभलेले आहे. त्यांचा ऋणनिर्देश करणे हे मी माझे नैतिक कर्तव्य समजतो. या शोधनिबंधाचे काम पूर्ण करण्यास ज्यांची प्रेरणा व कुशल मार्गदर्शन सतत लाभले ते माझे मार्गदर्शक व राज्यशास्त्राचे प्रपाठक डॉ. अशोक चौसाळकर यांचे ऋण व्यक्त करण्यास शब्दच अपुरे वाटत आहेत. त्यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना व केलेले मार्गदर्शन याबद्दल मी नम्रतापूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

राज्यशास्त्र विभागाचे डॉ. के.के. कावळेकर यांनीही बहुमोल सहकार्य केले. त्यांचाही मी आभारी आहे. तसेच डॉ. लक्ष्मीनारायण, डॉ. वासंती रासम, डॉ. स्नेहप्रभा नानिवडेकर, प्रा. भारती पाटील यांचेही योग्य मार्गदर्शन लाभले. तसेच श्री. संभाजी तोरस्कर यांनीही वेळोवेळी सहकार्य केले या सर्वांचा मी आभारी आहे.

प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे बहुमोल सहकार्य लाभले. त्यांच्या

सहकार्याबद्दल मी नम्रतापूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो व आभार मानतो. तसेच आर्ट्स, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजीच्या प्राचार्या सौ. विजया पाटील यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

याप्रबंधाच्या रचनेमध्ये संशोधन काळात ज्या मंडळींनी सहकार्य केले त्यात माजी आमदार श्रीपतराव शिंदे, श्रीमती रत्नमाला घाळीवहिनी, पत्रकार सुभाष धुमे, जगदीश पाटील, मधुकर लोंढे या पत्रकारांचा समावेश होतो. तसेच आचार्य शांताराम गरुड, भगवानराव शोळके, प्रा. एस्. व्ही. नाईक, प्रा. व्ही. आर. कुर्लेकर, प्रा. ए. के. जाधव, प्रा. एम्. ए. पाटील, प्रा. ए. ए. पोतदार, प्रा. टी. बी. आडसूळ, प्रा. शिवानंद कट्टीकर, प्रा. रमेश लवटे, प्रा. एन्. एम्. पाटील, ग्रंथपाल बी. बी. आयरे, सहाय्यक श्री. पाठक ए. टी. व इतर कर्मचारी यांचे बहुमोल सहकार्य लाभले. या सर्वांचा मी आभारी आहे.

प्रस्तुत विषयासंदर्भातील ज्या संदर्भ ग्रंथांची गरज होती ती गरज शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालय आणि आर्ट्स, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी या ग्रंथालयाने पूर्ण केली. या ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांचे या कामी सहकार्य लाभले. तसेच दैनिक पुढारी, दैनिक सकाळ, दैनिक सत्यवादी या वृत्तपत्रांचे संपादक व ग्रंथालय कर्मचारी यांचे मौलिक सहकार्य लाभले. या सर्वांचा मी आभारी आहे.

माझी पत्नी सौ. प्रभावती खापरे हिच्या प्रेरणेमुळे व सहकार्यामुळे मी हे काम लवकर पूर्ण करु शकलो. त्यामुळे तिचे ऋण मानणे हे माझे कर्तव्य आहे. माझ्या कन्या कु. शैलजा, व कु. प्रियांका या लहान असूनही शांतता राखून सहकार्य केले. तसेच माझे सर्व बंधू व इतर सर्व कुटुंबीय, पुतण्या शिवगोंडा खापरे, भाचे बाळासाहेब वालीकर, शिवराज हेगडे यांचे

विशेष सहकार्य लाभले. त्याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहे.

शोध निबंधाचे काम अत्यंत तत्परतेने पूर्ण करून देण्याचे श्रेय श्री. विष्णू खाडे यांना आहे. त्यांचाही मी आभारी आहे. वास्तविक हे काम अनेकांच्या सहकार्याने पूर्ण झाल्याची मला जाणीव आहे. सर्वांच्या नावाचा उल्लेख करणे शक्य नाही. म्हणून ज्यांची मदत झाली त्या ज्ञात अज्ञात या सर्वांचा मी आभारी आहे.

ध न्य वा द।

कोल्हापूर.
दिनांक -४-४-१९९६


प्रा. कऱ्याप्पा शिवाप्पा खापरे


.....

# अनुक्रमणिका



| प्रकरण क्रमांक | | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | | न का शे | १ – ५ |
| प्रकरण पहिले | – | गडहिंग्लज तालुका : सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी. | ६ – ५५ |
| प्रकरण दुसरे | – | गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणातील बदल | ५६ – १३१ |
| प्रकरण तिसरे | – | गडहिंग्लज नगरपालिकेचे राजकारण | १३२ – १९३ |
| प्रकरण चौथे | – | गडहिंग्लज साखर कारखान्याचे राजकारण | १९४ – २६३ |
| प्रकरण पाचवे | – | गडहिंग्लज पंचायत समिती आणि काँग्रेस पक्षातील राजकारण | २६४ – ३२४ |
| प्रकरण सहावे | – | गडहिंग्लज तालुक्यातील स्थानिक राजकारण : एक टीकात्मक अभ्यास | ३२५ – ३४० |
| प्रकरण सातवे | – | उ प सं हा र | ३४१ – ३५० |
| | | संदर्भ ग्रंथ | ३५१ – ३५८ |


.....



म ध्य प्र दे श
आं ध्र प्र दे श
सूची
महाराष्ट्र राज्य
जिल्ह्याचे स्थान
कोल्हापूर
किलोमीटर
राज्य सीमा
जिल्हा सीमा


कोल्हापूर जिल्हा
तालुके
शाहूवाडी
पन्हाळा
हातकणंगले
शिरोळ
कोल्हापूर
(करवीर तालुका)
कागल
गगनबावडा
राधानगरी
गारगोटी
(भुदरगड तालुका)
गडहिंग्लज
आजरा
चंदगड
उ
अभ्यास क्षेत्र
क... कर्नाटक राज्याचा भाग
किलोमीटर

# गडहिंग्लज तालुका



# गडहिंग्लज शहराचा नकाशा




गडहिंग्लज शहरातील प्रमुख
स्थळे दर्शविणारा नकाशा.

# GADHINGLAJ TALUKA SAHAKARI SAKHAR KARAKHANA LTD - GADHINGLAJ DIST - KOLHAPUR

## MAP OF AREA OF OPERATION

COMPRISES 89 VILLAGES OF GADHINGLAJ TALUKA & 12 VILLAGES OF AJARA TALUKA

